शाहीर रामजोशी ह्या दोघांच्या जीवनावर चित्रमहर्षी शांतारामबापूंनी चित्रपट काढले. सोलापूरने चित्रपटसृष्टीला कलाकारही दिले. पहिली सोलापूरातली मराठी कलावती शीला शुक्ल ह्यांनी सोहराब मोदी यांच्या पृथ्वीवल्लभ व त्यांच्या अनेक चित्रपटांत काम केली. ज्यांनी हिंदीत खलनायिकेच्या भूमिकेत आपला ठसा उमटवला त्या शशीकलाबाई सोलापूरातल्याच आणि त्यांना चित्रपटसृष्टीत आणलं शीला शुक्ल यांनी. आपल्या सुरेल आवाजाने मराठी रंगभूमी व्यापून टाकणाऱ्या फैय्याज ह्याही सोलापूरच्याच आणि मराठी रंगभूमी व चित्रपटांना वेगळे वळण देणारे डॉ. जब्बार पटेल ज्यांचा मराठी चित्रपटसृष्टी व रंगभूमी यशस्वी करण्यात सिंहाचा वाटा आहे.

आणि त्याच श्री सिध्देश्वराची कृपा असलेल्या पुण्यनगरीत मला नाट्यसंमेलनाचे अध्यक्षपद भूषवण्याचा जो बहुमान मिळाला हे माझ भाग्य आहे. आणि म्हणूनच मी आपल्याला प्रेमाने सांगतो 'आय लव्ह यु सोलापूर ॲंड रियली लव्ह यु सोलापुरकर.'

माझी ८८ व्या नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षपदी बहुमतांनी निवड झाली. अनेक प्रतिक्रिया उमटल्या काही लोकांना असही वाटलं की, मी सिनेमातला तर हा रमेश देव नाट्यसंमेलनाचा अध्यक्ष कसा? विशेषत: नवीन पिढीतील रसिकांना अस वाटणं शक्य आहे. कारण त्यांनी माझी नाटक पाहिली नाहीत हे माझ बॅड लक. तेव्हा मला सांगावस वाटतय की, माझ्या रक्तात नाटक आहे. माझ्या आजोबांनी आनंदीबाईच कारस्थान अर्थात 'ध चा मा' असं नाटक लिहलं होत व त्याचे त्याकाळी कोल्हापूर व सांगलीत काही प्रयोगही झाले होते. माझे वडील ॲडव्होकेट होते. कोल्हापूरच्या शाहु महाराजांचे लिगल ॲडवाइझर होते. त्यांना नाटकाची फार आवड होती. त्यांना गडकरी सेक्सपियर मुखोत्गत होते. अत्रे. पी. के व बाबुराव पेंढारकर हे त्यांचे मित्र होते. हे दोघेही आमच्या कोल्हापूरच्या घरी वारंवार येत असत. तेव्हा ते नाटकातील संभाषण अभिनय करुन एकमेंकाना ऐकवत असत.

माझ्या आजोबांनी मला माझ्या वयाच्या ११-१२ व्या वर्षी मेळ्यात काम करण्याची परवानगी दिली होती. आताच्या पिढीला मेळा म्हणजे काय हे माहित नसणार म्हणून थोडं सविस्तर सांगतो. मेळा म्हणजे बाल नाटकं व प्रायोगिक रंगभूमी यांची सुरुवात किंवा बाल्यावस्था असं म्हणावयास काही हरकत नाही . फरक फक्त इतकाच